**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. ०२/२००९/ दिनांक :

श्री. बाळासाहेब पांडुरंग घाडगे, अर्जदार
मु.पो. बोरगांव, ता. करमाळा,
जि. सोलापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, ऊर्जा नगर,
मुरारजी पेठ, सोलापूर- ००१

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
संवसु विभागीय कार्यालय, बार्शी

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभागीय कार्यालय, करमाळा,
जि. सोलापूर

**कोरम :-** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, ग्राहक सदस्य यांचे तर्फे दिनांक : ०२.०३.२००९

श्री. बाळासाहेब पांडुरंग घाडगे, मु.पो. बोरगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर यांनी गट क्र. ९८ मध्ये शेतीपंपासाठी ३ एच.पी जोडणीस सहाय्यक अभियंता, उप विभाग, करमाळा यांच्याकडे दि. २.५.२००२ रोजी मागणी अर्ज केला. त्यानंतर दिनांक ५.२.२००७ नंतर दिलेल्या कोटेशनची रक्कम रु. ७५६०/– भरुन दिनांक १.६.२००७ रोजी तपासणी अहवाल सादर केल्यावरही वीज जोडणी मिळाली नाही हि मूळ तक्रार आहे.

त्या अनुषंगाने संबंधित वि.प.च्या कार्यालयात प्रत्यक्षात व पत्राद्वारे संपर्क करुनही कांही उपयोग न झाल्याने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर सर्कल यांच्याकडे ' क्ष ' फॉर्ममध्ये दि. १०.४.२००८ रोजी तक्रार नोंदविली. सदर अर्ज प्रकरणी सुनावणी होवून आदेश क्र. ४९४५ दि. १०.७.२००८ रोजी पारित केला. सदर आदेश तक्रारदार ग्राहकास मान्य नसल्याने ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल यांच्यासमोर ' अ ' अनुसूचिमध्ये दि. ६.१.२००९ रोजी तक्रार नोंदविण्यात आली. मंचाने प्रस्तुत अर्ज प्रकरणी वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागितला व त्यानंतर दि. १०.२.२००९ रोजी सोलापूर सर्कल येथे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळी उभयतांनी हजर केलेली कागदपत्रें केलेली कथने व म्हणणे, मूळ तक्रार अर्ज, अंतर्गत कक्ष, सोलापूर यांचा आदेश इ. कागदपत्रांच्या आधारे अर्जदार ग्राहक व विरुध्द पक्षकार ( वीज वितरण कंपनी ) यांच्या मागणीचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे आहे.

तक्रारदार श्री. घाडगे यांच्या तक्रारीचे व मागणीचे सर्वसाधारण स्वरुप

दि. २.५.२००२ रोजी वीज जोडणीसाठी अर्ज केला. परंतु दि. ४.२.२००७ पर्यंत कोटेशन दिलेले नव्हते. दि. ९.२.२००७ रोजी कोटेशन दिल्यावर दि. १०.२.२००७ रोजी रु. ७५६०/– भरणा केलेला आहे. आवश्यक तो तपासणी अहवाल दि. १.६.२००७ रोजी दिलेला आहे. तसेच कपॅसिटरही दि. १.६.२००७ रोजी करमाळा कार्यालयाकडून कएमएल/४३६१०७ नोंदवून मिळाला. तथापी आपणाकडे तक्रार नोंद करेपर्यंत कनेक्शन मिळाले नाही. मजला सत्वर वीज जोडणी मिळावी. तसेच विनियम ०५ अन्वये नुकसान भरपाई मिळावी. शेती पिकाचे झालेले नुकसान भरपाईही मिळावी इ. मागण्या तक्रारीत नोंदविल्या आहेत.

विरुध्द पक्षकार तथा वीज वितरण कंपनीचे म्हणणे

सदर अर्जदाराने रक्कम जमा केली आहे. ५ पोलचे काम आहे. SPA/PE/KML/261/06-07 ने ३ एचपीची मंजुरी दिलेली आहे. करमाळा उप विभागाकडे पैंसे भरणाऱ्या ६१० शेतकरी ग्राहकाची यादी प्रलंबित आहे. सदर श्री. घाडगे यांचा यादीतील क्रमांक ४७५ असा आहे. साधनसामुग्री उपलब्ध नसल्याने जोडणी देणे शक्य झाले नाही. तथापी ए.जी. टर्न की वर्क ऑर्डरनुसार ठेकेदारास प्रतिक्षा यादीप्रमाणे काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ग्राहकाचा क्रमांक आल्यावर जेष्ठता क्रमानुसारच जोडणी दिली जाईल. ग्राहकास त्वरेने जोडणी हवी असल्यास होणारा खर्च व इन्स्पेक्शनची १५% रक्कम जमा केल्यास परिपत्रक क्र. २५६८० दि. १९.६.२००८ प्रमाणे जोडणी देता येईल. सदर कामातील अंदाजपत्रकानुसार झालेला खर्च विद्युत देयकातून कंपनीच्या नियमाप्रमाणे वजावट करता येईल. मात्र सध्या त्वरीत जोडणी देणे शक्य नसल्याचे व साधनसामुग्री उपलब्ध नसल्यामुळेच विलंब झाल्याचे नमूद केले आहे.

वरील सर्व तपशील पहाता, मी खालील निष्कर्षाप्रत आलो आहे.

ग्राहकाने कंपनीने कळविल्याप्रमाणे दि. ५.२.२००७ रोजी रु. ७५६०/–चा भरणा केलेला आहे. तपासणी अहवाल व कपॅसिटर नोंदणी दि. १.६.२००७ रोजी विहित नमुन्यात दिली असल्याचे दिसून येते.

वि.प.ची हि त्यास सहमती आहे. तथापी प्रतिक्षा यादी व त्यातील जेष्ठता क्रमांक यानुसारच जोडणी देणार या कंपनीच्या मताशी मी सहमत नाही. तथापी सर्व कागदपत्रांची पाहणी करता, पुढील मुद्दे उदभवतात.

प्रश्न :– (१) ग्राहकाने दि. २.९.२००२ रोजी अर्ज दिला. मात्र खर्च करण्या संबंधीचा तपशील वि.प.ने दि. ५.२.२००७ रोजी कळविला. सदरचा कालावधी विनियमातील तरतुदीनुसार योग्य आहे का ? तसेच सदर विलंबाबद्दल तरतुदी प्रमाणे नुकसान भरपाई देणे योग्य आहे का ?

उत्तर :– होय. ग्राहकाने करावयाच्या खर्चाचा तपशील कळविण्यास विलंब झाला आहे. तरतुदी प्रमाणे नुकसान भरपाई देणे योग्य आहे.

प्रश्न :– (२) दि. १.६.२००७ रोजी ग्राहकाचा अर्ज परिपूर्ण झाल्यावर त्यास प्रतिक्षा यादी व त्यातील त्याचा जेष्ठता क्रमांक या विषयी कळविले होते का ?

उत्तर :– नाही. मात्र ग्राहकाने तक्रार केल्याव अंतर्गत कक्षास तसे कळविलेले दिसून येते.

प्रश्न :– एक योजना मंजूर करुन त्यात रक्कम भरुन घेणे व नंतर दुसरे परिपत्रक वा योजना याकडे बोट दाखविणे वा अग्रक्रमांकानुसार जोडणी देता येईल इ. पर्याय योग्य आहेत का ?

उत्तर :– नाही. अर्ज दाखल झाल्यवर वस्तुस्थितीची माहिती लेखी स्वरुपात देणे. तसेच ज्या योजनेखाली मंजुरी दिली आहे त्याचप्रमाणे जोडणी देणे योग्य आहे. दुसऱ्या योजनेचा पर्याय प्रथमच देणे योग्य होते. तसे झालेले दिसत नाही.

प्रश्न :– आदेश ?

उत्तर :– अखेरच्या आदेशाप्रमाणे

**कारणमिमांसा**

तक्रारदाराने दि. २.५.२००२ रोजी वीज मागणीचा अर्ज दिल्यावर दि. ५.२.२००७ पर्यंत त्याने करावयाच्या खर्चाचा तपशील कळविण्यास विलंब झालेला आहे. अधिनियम २००३ मधील तरतुदी नुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या विनियमातील तरतुदीप्रमाणे जोडणी व त्यासंबंधी नुकसान भरपाइ देणे योग्य आहे. वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके व विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितकरण विनियम २००५ हे २० जानेवारी २००५ पासून अस्तित्वात आले आहे व त्यामुळेच २० जानेवारी २००५ पासूनचा पुढील कालावधी भरपाई देतांना विचारात घ्यावा लागेल. त्यामुळे २०.१.२००५ ते ५.२.२००७ हा कालावधी ' भरपाईचे निश्चितीकरण कलम १२ ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे परिशिष्ट ' अ ' प्रमाणे नोंदीनुसार करावा लागेल. परिशिष्ट ' अ ' मधील २ नुसार ' वितरण मेन्सचा विस्तार ' या खाली अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवस अवधी नंतर म्हणजेच २० फेब्रुवारी २००५ ते ५.२.२००७ हा कालावधी रु. १००/– प्रति आठवड्यास या प्रमाणे १०६ आठवडे रु. १००/– विलंब भरपाई असे रु. १०,६००/– तसेच पूर्ण भरलेला अर्ज दि. ५.२.२००७ ला प्राप्त झाल्यावर ' वीज पुरवठा करण्याचा कालावधी ' यामध्ये वितरण मेन्सचा विस्तार असल्याने तीन महिन्यांनी म्हणजे दि. ५.५.२००७ रोजी वीज पुरवठा देणे आवश्यक होते. तसे न केल्याबद्दल दि.५.५.२००७ पासून दि. ३.३.२००९ पर्यंत होणारा कालावधी हा विलंब असल्यामुळे तरतुदीनुसार ९५ आठवड्याचे य. १००/– विलंबाच्या प्रति आठवड्यास प्रमाणे रु. ९५००/– इतकी भरपाई द्यावी. साधनसामुग्रीचा अभाव असल्यामुळे जोडणी देण्यास विलंब झाल्यचे वि.प.ने मान्य केले आहे.

तथापि, प्रथम स्तरावरच अर्ज स्विकारल्यावर त्वरीत वस्तुस्थिती लेखी कळविणे आवश्यक होते. वि.प.कडून हे घडले नाही किंबहुना ग्राहकाने वारंवार तोंडी, लेखी विचारणा केल्यावर उप विभागाची जेष्ठता यादी व त्यात ग्राहकाचा नंबर यास योग्य प्रसिध्दी दिलेली नाही. कंपनी आपल्या धोरणानुसार वीज जोडणी देणार असेल तर अशा जेष्ठता यादीचा वापर करणे योग्य आहे. दि. २.५.२००२ ते दि. ३.३.२००९ हा सर्वसाधारण ५ वर्षांचा कालावधीचा विचार करता कक्षाने आपल्या आदेशात नोंदविल्या प्रमाणे २००३–०४ सालातील पूर्ण अर्जास जोडणी देण्याचे काम चालू आहे. तर मग दि. २.५.२००२ नंतर लगेचच खर्चाचा तपशील कळविला असता तर आधीच जोडणी मिळाली असती. केवळ कार्यालयीन हलगर्जीपणामुळेच खर्च तपशील कळविण्यास विलंब झालेला आहे. सर्व बाबींचा परामर्श घेता, विनियमातील तरतुदींचा विचार करुन वर उल्लेख केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देणे उचित आहे व त्वरीत जोडणी देणे योग्य आहे.

प्रथम पासूनच ग्राहकाच्या मागणी अर्जाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. तसेच परत अंतर्गत कक्ष सोलापूर सर्कल येथेही तसेच झालेले आहे. सुनावणी तारखांचा घोळ, त्याच्या नोंदी ग्राहकास हेलपाटे घालावयास लागणे व त्यामुळे त्यास होणारा आर्थिक व मानसिक त्रास याचाही विचार करावा लागेल. अंतर्गत कक्ष, सोलापूर यांनी आपल्या कक्ष कार्यप्रणालीत सुसूत्रता आणणे महत्वाचे आहे.

## **आदेश**

१) अंतर्गत कक्ष सोलापूर यांचा आदेश क्र. ४९४५ दि. १०.७.२००४ रद्द करणेत येत आहे.

२) वर उल्लेख केल्याप्रमाणे खर्चाचा तपशील कळविण्यास आलेली विलंब भरपाई रु. १०,६००/– व जोडणी विलंब भरपाई रक्कम रु. ९५००/– असे एकत्रित रु. २०,१००/– रोखीने देण्यात यावेत.

३) वीज जोडणी त्वरीत म्हणजे ३० दिवसांचे आंत द्यावी.

४) पिकाची नुकसान भरपाई मान्य करण्यात येत नाही.

५) ग्राहकास ३० दिवसाचे आंत वीज जोडणी द्यावी व तसा अहवाल मंचास सादर करावा.
सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०२.०३.२००९

के.वाय. जगताप, अध्यक्ष, :

एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :

श्री. बाळासाहेब पांडुरंग घाडगे, रा. बोरगांव, ता. करमाळा यांचे शेतीपंपास वीज जोडणी देणेस झालेल्या विलंबाचे तक्रार प्रकरण क्र. २/०९ वर सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांजकडून खालील प्रमाणे न्यायनिर्णय देणेत येत आहे.

तक्रारदार यांना ३ अश्वशक्ती नवीन शेती वीज पंपास वीज जोडणी मिळणेस वि.प.कडे दि. २.५.२००२ रोजी अर्ज केला होता. त्यास वि.प.कडून मंजुरी व मिळालेले कोटेशन दि. १०.२.२००७ ला भरुन तक्रारदाराने वीजपंप बसविलेचा चाचणी अहवाल दि. १.६.२००७ ला वि.प.कडे सदर केला आहे. अद्यापपावेतो वीज जोडणी मिळालेली नाही.

या बाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांजकडे क्ष नमुन्यात तक्रार दि. २५.१०.२००८ रोजी दाखल केली होती. त्यावर कक्षाने आदेशपत्र क्र. ४९४५ दि. १०.७.२००८ ने दिलेला निर्णय मान्य झाला नसल्याने तक्रारदार यांनी मंचाकडे दि. ६.१.२००९ रोजी ' अ ' नमुन्यात अपील दाखल केले आहे. या बाबत मंचाने प्राथमिक कार्यवाही अंतर्गत वि.प.चे संबंधित अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय म्हणणे मागविले व सुनावणीची तारीख दि. १०.२.२००९ सोलापूर मंडल येथे ठेवण्यात आली.

सुनावणीवेळी वि.प.चे सहाय्यक अभियंता, करमाळा उप विभाग, प्रभारी कार्यकारी अभियंता/ नोडल अधिकारी सोलापूर मंडल व स्वत: तक्रारदार इ. उपस्थित होते.

<u>तक्रारदाराची तक्रार</u>

वि.प.कडे गट क्र.९८ बोरगांव, ता.करमाळा येथे ३ अश्वशक्ती वीज जोडणी मागणी दि. २.५.२००२ ला केली. त्यास वि.प.कडून मंजुरी मिळालेनुसार कोटेशन रक्कम भरली. दि. १.६.२००७ ला कपॅसिटर तपासून मिळाला, अद्याप पर्यंत वीज जोडणी मिळालेली नाही. वि.प.च्या कार्यालयात चौंकशी करता, जेष्ठता यादी विचारांत घेता, अद्याप क्रमांक आला नाही असे सांगण्यात आले. तसेच अंतर्गत कक्षाकडील तक्रारीचे सुनावणीवेळी बोलाविणे पाठविणेत आले असता, अधिकारी हजर नव्हते व या उलट, निकालपत्रात तक्रारदार हजर नव्हते असे नमूद आहे. तसेच त्यानंतर दि. १३.६.२००८ रोजी ठेवलेली सुनावणी दि. २०.६.२००८ ला ठेवलेचे कळविले नसलेने हेलपाटा झाला इ.

<u>वितरण कंपनीचे म्हणणे</u>

तक्रारदार यांनी गट क्र. ९८ मध्ये नवीन ३ अश्वशक्ती शेतीपंप वीज जोडणी मिळणेस दि. २.५.२००२ रोजी मागणी अर्ज केला आहे. दि. २४.११.२००६ ला मंजुरीस प्रकरण विभागीय कार्यालयास पाठविले तेथे सदर प्रकरणास क्र. एसपीए/पी३/केएमसी/२६१/०६–०७ ने मंजुरी मिळाली व दिनांक ५.२.२००७ रोजी रु. ७५६०/– रकमेचे कोटेशन देण्यात आले ते दि. १०.२२००७ रोजी भरणा करण्यात आले. ग्राहकाने दि. १.६.२००७ रोजी वीज पंप बसविलेचा चाचणी अहवाल सादर केला.

करमाळा उप विभाग क्षेत्रात नवीन जोडणी करीता मागणी असलेल्या अर्जदाराची संख्या ६१० आहे व विद्युत साहित्याचे अनुपलब्धेमुळे सदर काम करणे शक्य झाले नाही. अर्जदाराचा शेतीपंपाचे जेष्ठता यादीत क्रमांक ४७५ आहे. सद्यस्थितीत प्रलंबित शेतीपंपाची कामे करण्या करीता निविदा कार्यवाही झाली असून ठेकेदाराकडून कामे करणे सुरु आहे. तक्रारदाराचा क्रमांक आल्यावर सदर काम करणेत येईल.

सदस्य सचिव यांचा निष्कर्ष :

संबंधित उप विभाग क्षेत्रात शेतीपंप जोडण्या मागणाऱ्यांची संख्या जास्त असलेचे व विद्युत साहित्याची कमतरता असलेने कामे प्रलंबित राहिलेचे वि.प.कडून नमूद करणेत आले आहे. तसेच प्रलंबित कामाचा निपटारा करणेस निविदा कार्यवाही सुरु आहे असे सांगण्यात आले. तसेच डि.डि.एफ. याजेनेत वीज जोडणीचा पर्याय सांगण्यात आला.

दुसरीकडे तक्रारदारांनी वीज जोडणी मिळाली नसलेमुळे शेती पीके घेता आली नाही व त्यांचे रु. ४० ते ४५ हजारांचे आर्थिक नुकसान झालेचा मुद्दा मांडला आहे. परंतु नेमके नुकसानीची रक्कम किती व कशी याचे पुराव्यासह गणित मांडले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई विचारात घेता येणार नाही व मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००५ कृती मानके वीज पुरवठ्याचा कालावधी – भरपाईचे निश्चितीकरण याची अंमलबजावणी सन २००५ पासून सु रु झाली असलेने व तक्रारदाराची वीज जोडणी न मिळालेच्या तक्रारीचा कालावधी त्यापूर्वी ३ वर्षे आधी सुरु झाला असल्यामुळे नुकसान भरपाई देणे लागू होणार नाही.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रें, जबाब इ. विचारांत घेऊन, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांजकडून खालील आदेश निर्गमित करणेत येत आहेत

## आदेश

१) तक्रारदाराचे अपील फेटाळण्यात येत आहे.

२) भरपाई बाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेसे त्यांना आदेशाचे तारखे पासून ६० दिवसांत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा – कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(एस. आर. बांबळे)
सदस्य सचिव (ग्रातनिमं)

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०२/२००९/ दिनांक :

श्री. बाळासाहेब पांडुरंग घाडगे, अर्जदार
मु.पो. बोरगांव, ता. करमाळा,
जि. सोलापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, ऊर्जा नगर,
मुरारजी पेठ, सोलापूर– ००१

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
संवसु विभागीय कार्यालय, बार्शी

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभागीय कार्यालय, करमाळा,
जि. सोलापूर

**कोरम** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



## न्याय निर्णय

श्री. का.अ. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०९.०४.२००९

या प्रकरणामध्ये मंचाचे सदस्य श्री. लेले यांनी आपला निर्णय दिलेला आहे. त्याबाबत मी अध्यक्ष या नात्याने त्या निर्णयाशी सहमत झालेलो नाही. तसेच मंचाचे सदस्य सचिव श्री. बांबळे हेही श्री. लेले यांच्या निर्णयाशी सहमत नाहीत. त्यामुळे त्यांनीही त्यांचा न्याय निर्णय वेगळा दिलेला आहे. श्री. बांबळे यांच्या निर्णयाशीही मी सहमत नसल्याने माझे निर्णयपत्र मी खालील प्रमाणे देत आहे.

या प्रकरणामध्ये मौंजे बोरगांव. ता. करमाळा, जि. सोलापूर येथील शेतकरी श्री. बाळासाहेब पांडुरंग घाडगे यांनी त्यांचे गट क्र. ९८ मध्ये ३ अश्वशक्ती मोटर पंपसेटसाठी विजेची मागणी केलेली होती. अशी मागणी सहाय्यक अभियंता, उप विभाग, करमाळा यांचेकडे दि. २.५.२००२ रोजी अर्जदार यांनी अर्ज देवून केलेली होती. तदनंतर दि. २४.११.२००६ रोजी त्यांच्या वरील अर्जाबाबत संबंधित अधिकाऱ्याने प्रस्ताव विभागीय कार्यालय, बार्शी यांच्याकडे सादर केला. पुढे विभागीय कार्यालयाकडून पत्र क्र. २६१/०६–०७ अन्वये वरील प्रमाणे वीज पुरवठ्यासाठी मंजुरी देण्यात आली. त्या मंजुरीप्रमाणे ५ विजेचे खांब व विजेच्या जाळ्या उभारणी बाबत मंजुरी देण्यात आली. दि. ५.२.२००७ रोजी अर्जदारास वि.प.तर्फे रक्कम रु. ७५६०/– भरणे बाबत कोटेशन देण्यात आले. अर्जदाराने दि. १०.२.२००७ रोजी वरील कोटेशनची रक्कम भरलेली आहे. पुढे दि. १.६.२००७ रोजी मोटर पंपसेट व विजेबाबत चाचणी अहवालही सादर केला. असे असतांनाही तसेच वेळोवेळी विचारणा करुनही अर्जदारास विजेची जोडणी दिली गेली नाही. परिणामी, अर्जदाराने दि. १०.४.२००८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांचेकडे " क्ष " नमुन्यामध्ये तक्रार नोंदविली. त्या तक्रारीची सुनावणी होवून दि. १०.७.२००८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांनी तक्रारीवर निर्णय दिला व प्रतिक्षा यादीनुसार अर्जदारास वीज जोडणी देणेबाबत आदेश केला. मात्र नुकसान भरपाई बाबत कोणताही आदेश केला नाही.

वरील निर्णय अर्जदारास न पटल्यामुळे अर्जदाराने या मंचाकडे दि. ६.१.२००९ रोजी अ नमुन्यामध्ये अपील दाखल केले. सदरचे अपील सुनावणीकामी वि.प.स मंचाकडून नोटीस देवून सदर अपिलावर म्हणणे मागविले. त्याप्रमाणे दि. १०.२.२००९ रोजी वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता यांनी म्हणणे दाखल केले.

अर्जदाराने दि. २.५.२००२ रोजी केलेला वीज मागणी अर्ज वि.प.स मान्य आहे. त्यावर दि. ५.२.२००७ रोजी अर्जदारास प्रथम कोटेशन देण्यात आले हेही वि.प.स मान्य आहे. दि. १०.२.२००७ रोजी कोटेशन प्रमाणे अर्जदाराने रक्कम भरली हेही वि.प.स मान्य आहे. तसेच अर्जदाराने दिनांक १.६.२००७ रोजी मोटरपंप बसविलेबाबतचा चाचणी अहवाल वि.प.कडे सादर केला हेही त्यांना मान्य आहे. परंतु वि.प.चे म्हणणे की, करमाळा उप विभागामध्ये पैंसे भरलेल्या प्रलंबित शेती पंपांची संख्या ६१० आहे. साधन सामुग्रीच्या अभावामुळे संबंधितांना विद्युत पुरवठा करणे मुदतीत शक्य झाले नाही. सद्या अर्जदाराचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक ४७५ असा आहे. वितरण कंपनीने टर्न की वर्क ऑर्डर ठेकेदाराला दिलेली आहे. परिणामी, प्रतिक्षा यादीप्रमाणे अर्जदाराचे जरुर ते काम करुन प्रतिक्षा यादीप्रमाणे त्यांना विद्युत पुरवठा करण्यात येईल.

दोन्ही पक्षकारांनी वरील प्रमाणे निवेदन केल्यानंतर सदर प्रकरणी या मंचाने अर्जदार तसेच वि.प.तर्फे संबंधित अधिकारी यांचे युक्तीवाद समक्ष सोलापूर कार्यालयामध्ये ऐकले. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे तसेच आमच्या समोर आलेली कागदपत्रें व विद्युत कायदा व अधिनियम तसेच कृती मानके या बाबत समग्र विचार करता, खालील मुद्दे आमच्या निष्कर्षासाठी उदभवतात.



१) अर्जदाराचे वीज मागणीनुसार त्यांना जरुर ते खर्चाचे कोटेशन देण्यासाठी एस.ओ.पी.प्रमाणे विलंब झाला आहे काय ?

उत्तर :– होय

२) वरील प्रमाणे झालेल्या विलंबा बाबत अर्जदारास कृती मानकेप्रमाणे नुकसान भरपाई मिळणेचा हक्क आहे काय ?

उत्तर :– नाही, कारण सदरची मागणी ही महाराष्ट्र वीज नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच) अधिनियम २००६ मधील अधिनियम ६:६ नुसार मुदतीबाहेर गेलेली आहे.

३) अर्जदाराने दि. १.६.२००७ रोजी चाचणी अहवाल सादर केल्यानंतर एस.ओ.पी.प्रमाणे मुदतीमध्ये अर्जदारास विद्युत पुरवठा करण्यात आला आहे काय ?

उत्तर :– नाही.

४) वरील प्रमाणे विद्युत पुरवठा करण्यास झालेला विलंब बाबत अर्जदारास एस.ओ.पी. प्रमाणे नुकसान भरपाई मिळणेचा हक्क आहे काय ?

उत्तर :– होय. कृती मानके परिशिष्ट अ मधील कलम ३ प्रमाणे विलंबाचे प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे

५) आदेश ?

उत्तर :– अखेरच्या आदेशाप्रमाणे

**कारणमिमांसा**

मुद्दा क्र. १ व २ :

या प्रकरणामध्ये अर्जदाराने दि. २.५.२००२ रोजी वीज मागणी बाबत अर्ज केला व पुढे त्यास दि. ९.२.२००७ रोजी पैंसे भरणेबाबत कोटेशन दिले व त्याप्रमाणे दि. १०.२.२००७ रोजी अर्जदाराने कोटेशनचे पैंसे भरले ही बाब वि.प.स मान्य आहे. परिणामी, सकृतदर्शनी सन २००२ ते २००७ पर्यंत अर्जदारास पैंसे भरणेबाबत कोटेशन दिलेले नाही ही बाबत सिध्द होते. कृती मानके विनियम २००५ हा २० जानेवारी २००५ पासून लागू झाला. परिणामी, अर्जदारास कृती मानके प्रमाणे नुकसान भरपाई मागण्याचा हक्क दि. २०.१.२००५ रोजी निर्माण झाला. कृती मानके परिशिष्ट अ (१) विद्युत पुरवठा करणे (२) अर्जदारास वितरण मेन्सचा विस्तार करण्याचा किंवा उपकेंद्र स्थापन करण्याची आवश्यकता असल्यास ३० दिवसांचे कालावधीमध्ये खर्चाचे कोटेशन

देणे आवश्यक आहे. म्हणजे या प्रकरणामध्ये दि. २०.१.२००५ नंतर ३० दिवस म्हणजे दि. २०.२.२००५ पर्यंत कोटेशन देणे आवश्यक होते व त्यानंतर अर्जदारास कृती मानके प्रमाणे नुकसान भरपाई मागण्याचा हक्क प्राप्त झाला. परंतु अर्जदाराने क्ष नमुन्यातील नुकसान भरपाई मागणीसाठी केलेला अर्ज हा दि. ३.५.२००८ रोजी केलेला आहे. सबब सदरचा नुकसान भरपाईचा अर्ज हा ३ वर्षे २ महिने व १३ दिवस एवढ्या मुदतबाह्य काळानंतर केलेला आहे. सबब अर्ज़दारास कृती मानके मधील तरतुदीप्रमाणे कोटेशन मुदतीमध्ये न मिळालेबाबत नुकसान भरपाई या मंचाकडून रेग्युलेशन २००६ मधील कलम ६:६ प्रमाणे देता येणार नाही. सबब आम्ही दोन मुद्दयांवर आमचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

<u>मुद्दा क्र. ३ व ४</u> :

सदरील अर्जदाराने दि. १.६.२००७ रोजी मोटरपंप बसविले बाबतचा चाचणी अहवाल कार्यालयास दिला ही बाब वि.प.स मान्य आहे. तदनंतर वि.प.चे संबंधित अधिकारी ठराविक मुदतीमध्ये चाचणी अहवालाच्या सत्यतेची पाहणी करणेसाठी समक्ष जागेवर गेले होते. या बाबत वि.प.तर्फे कोणताही पुरावा दाखल केलेला नाही व तसे त्यांचे म्हणणेही नाही.



कृती मानके परिशिष्ट अ (१) विद्युत पुरवठा करणे (२) प्रमाणे वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करणे आवश्यक असल्यास ३ महिन्यांच्या मुदतीमध्ये ग्राहकास असा विद्युत पुरवठा करणे आवश्यक आहे व असा विद्युत पुरवठा न केल्यास प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे नुकसान भरपाई मिळण्याचा ग्राहकास हक्क आहे. या प्रकरणामध्ये विद्युत पुरवठा अद्यापपर्यंत केलेला नाही हे वि.प.स मान्य आहे. परंतु त्यांचे म्हणणे की, साधन सामुग्रीचा अभाव असल्याने अर्जदारास वेळेत विद्युत पुरवठा करता आला नाही. तसेच करमाळा उप विभागामध्ये पैंसे भरलेल्या प्रलंबित शेतीपंपांची संख्या ६१० आहे व अर्जदाराचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक ४७५ असा आहे.

या बाबत आम्हास असे दिसून येते की, अर्जदाराच्या निवेदनाप्रमाणे अर्जदाराने पैंसे भरल्यानंतर अन्य लोकांचे अर्जाबाबत वि.प.ने विचार करुन त्यांना वीज जोडणी दिलेली आहे. तसेच अर्जदाराचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक ४७५ आहे ही बाब वि.प.तर्फे केवळ दि. १०.२.२००९ रोजी प्रथम सांगण्यात आली. असा अनुक्रमांक असल्याचे व प्रतिक्षायादी बाबतची तरतूद अर्जदारास कोटेशनप्रमाणे पैंसे भरतेवेळी सांगण्यात आली नव्हती. वास्तविक कोटेशनचे पैंसे भरतेवेळीच अर्जदारास नैंसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे प्रतिक्षायादीची कल्पना देणे आवश्यक होते व अशी बाब वि.प.कडून सांगितली गेली नव्हती. तसेच या प्रकरणामध्ये मूळ अर्ज मे २००५ चा असतांनाही त्यास कोटेशन हे फेब्रुवारी २००७ मध्ये देण्यात आले. अशा विलंबामुळे अर्जदाराचा प्रतिक्षायादीतील क्रमांक मागे पडला ही बाब या ठिकाणी विचारांत घेणे आवश्यक आहे. तांत्रिकदृष्ट्या अर्जदारास त्याप्रमाणे नुकसान भरपाई देता येत नाही. तरी प्रतिक्षायादीतील त्यांचा सद्याचा अनुक्रमांक सन २००२ चा असून त्यांच्या अर्जाचा विचार करता अद्यापपावेतो त्यांचा नंबर बराच वर गेला असता त्यामुळे त्यास विद्युत पुरवठाही या आधीच मिळणे आवश्यक होते. सबब प्रतिक्षायादी बाबतचा वि.प.ने केलेला युक्तीवाद या प्रकरणामध्ये आम्हांस तितकासा ग्राह्य वाटत नाही. या अर्जदाराच्या वीज जोडणीसाठी ५ खाबांची उभारणी व त्यावर तारांचे जाळे उभा करणे असल्याने कृती मानके परिशिष्ट अ ( १ विद्युत पुरवठा करणे (२) प्रमाणे ३ महिन्यांच्या मुदतीमध्ये ग्राहकास असा विद्युत पुरवठा करणे आवश्यक आहे. अर्जदाराने दि. १.६.२००७ रोजी चाचणी अहवाल दिला व त्याबाबत कोणताही उजर वि.प.तर्फे करण्यात आला नाही त्यामुळे दि. १.६.२००७ नंतर ३ महिन्यांचा कालावधी हा दि. १.९.२००७ रोजी संपला आहे. सबब दि. १.९.२००७ चे पुंढे क्ष नमुन्यातील अर्ज दाखल तारीख

३.५.२००८ पर्यंत अर्जदारास कृती मानके प्रमाणे भरपाई देय होते. असा काल ८ महिने २ दिवस होय. म्हणजे या बाबात पूर्ण ३२ आठवडे व पुढे २ दिवसांबाबत एक आठवडा असा ३३ आठवड्याबाबत अर्जदारास कृती मानके प्रमाणे भरपाई देणे आवश्यक ठरते. सबब ३३ x १०० म्हणजे रु. ३३००/– एवढी नुकसान भरपाई अर्जदारास देणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे नुकसान भरपाई देवून अर्जदाराची तक्रार संपुष्टात येत नाही. मूळ अर्जदाराचा विद्युत पुरवठा मिळण्याचा हक्काबाबत विचार करणे आवश्यक ठरते. सबब सद्याच्या अर्जदाराच्या प्रतिक्षायादीचा विचार न करता, त्यांचे वीज जोडणीसाठी ५ खांबाची उभारणी तसेच तारांचे जाळे टाकून आजपासून ३ महिन्यांचे आत अर्जदाराचे मोटरपंपास विद्युत पुरवठा करणे आवश्यक आहे. सबब आम्ही मुद्दा क्र. ३ व ४ कडे आमचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

वरील मुद्दयांचा व कारणांचा विचार करता, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेला निर्णय अंशत: मान्य करुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहेत.



## आदेश

१) सदरचे अपील मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदारास कोटेशन उशिरा दिले बाबत नुकसान भरपाई मिळणे बाबतचा हक्क मुदतबाह्य असल्याने नाकारण्यात आला आहे.

३) अर्जदारास वीज जोडणीस विलंब झाल्याने वि.प.कडून रक्कम रु. ३३००/– एवढी भरपाई देण्यात येत आहे. वि.प.ने वरील रक्कम अर्जदरास रोख स्वरुपात द्यावी अथवा त्याचे वीज जोडणीनंतर त्यांचे येणाारे वीज बिलामध्ये समायोजित करण्यात यावी.

४) अर्जदारास त्यांचे मोटरपंप बाबत वि.प.ने आजपासून ३ महिन्यांचे आत विद्युत पुरवठा करण्यात यावा व तसा अहवाल या मंचास सादर करावा.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( का.य. जगताप )
अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०९.०४.२००९

श्री. लेले व श्री. बांबळे, सदस्य यांचे निर्णय वाचले व त्यावरुन पुढील आदेश.

या प्रकरणामध्ये मंचाचे तिन्ही सदस्यांनी वेगवेगळे तीन न्यायनिर्णय दिलेले आहेत. परिणामी, मी मंचाचा अध्यक्ष या नात्याने महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील कलम८.१ प्रमाणे माझा कास्टिंग व्होटचा अधिकार वापरत असून मी अध्यक्ष या नात्याने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच सदस्य श्री. लेले व सदस्य सचिव श्री. बांबळे यांनी दिलेले दोन्ही न्यायनिर्णय माझ्या या निर्णयपत्रासोबत रेकॉर्ड म्हणून जोडण्यात यावेत.

( का. य. जगताप )
अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर